**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती   सभा क्रमांक :- ०५**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २७/८/२०१३

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती **सभा क्र.०५ शनिवार दि.३१/०८/२०१३ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**शनिवार   दिनांक-३१/०८/२०१३ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १२२ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक०८/०४/२०१३, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ शनिवार दिनांक०४/०५/२०१३, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ शनिवार दिनांक ०१/०६/२०१३ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०४ शुक्रवार दिनांक२१/०६/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| १२३ | अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील औरंगाबाद रस्त्यावरील वन हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १२४ | अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्यास्वरूपात वैद्यकीयअधिकारी यापदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची अटी व शर्तीप्रमाणे सहा महिन्याकरीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे ऑफिस रिपोर्ट. |
| १२६ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार १] डॉ.श्री. बाळासाहेब देवकर,२] डॉ.श्री.पी.आर.टेकवाणी, ३] डॉ.सौ.मिनाक्षी करडे , ४] डॉ.श्री. अमित करडे,५] डॉ.सौ. मृणाल वाघ, ६] डॉ.सौ. रूपाली झावरे,७] डॉ.सौ. कांचन रच्चा,८] डॉ.सौ.रूपाली शेळके/नेमाणे यांची तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टरांची दिनांक ९/५/२०१३ पासून दि.८/५/२०१६ अखेर तीन वर्षाकरीता व्हीजीट बेसवर अटी व शर्तीप्रमाणे पॅनलशिपवर करारबध्द नियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १२७ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्रमांक- ३९ हा अर्जदार सौ. मनिषा अक्षय भळगट, रा. प्रोफेसर कॉलनी, सावेडी,अ.नगर यांना जागा भाडेतत्वावर दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन लाईट बील मालमत्ता कर स्वतंत्र घेवून देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२८ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रस्तावीत आकृतीबंधामध्ये ५०६ व ३०५ कोर्ट कर्मचा-यांचे कायम आस्थापना सुचीवरील समकक्ष स्थायी पदावर समावेशन करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र. १२२ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ दिनांक०८/०४/२०१३,सभा क्रमांक-०२ दिनांक०४/०५/२०१३, सभा क्रमांक-०३ दिनांक ०१/०६/२०१३ व सभा क्रमांक-०४ दिनांक२१/०६/२०१३रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- १२३ ते १२८ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- १२२ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

ठराव क्रमांक- १२२ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक०८/०४/२०१३, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ शनिवार दिनांक०४/०५/२०१३, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ शनिवार दिनांक ०१/०६/२०१३ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०४ शुक्रवार दिनांक२१/०६/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ दिनांक०८/०४/२०१३, सभा क्रमांक-०२ दिनांक०४/०५/२०१३,सभा क्रमांक-०३ दिनांक०१/०६/२०१३ व सभा क्रमांक-०४ दिनांक२१/०६/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्र.१ दि. ८/४/२०१३ , सभा क्र २ दि. ४/५/२०१३ व सभा क्र.३ दि.१/६/२०१३ व सभा क्रमांक ४ दि. २१/६/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- इतिवृत्त वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे इतिवृत्त सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले.

मा.सभापती साहेब :- मा.श्री. कवडे व मा.श्री. बोरूडे यांनी ठराव क्र. २२ दिनांक ४/५/२०१३ गाळा क्र.२४ चे घरपट्टी आकारणीबाबत यादी दिलेले आहे. ती वाचून दाखवावी.

सभेमध्ये यादी वाचून दाखविण्यांत आली ती खालीलप्रमाणे..

मा.श्री.कवडे उ.खं.व मा.श्री. बोरूडे अ.व.:-मा. सभापती साहेब यांचे महोदय यादी देतो की, दिनांक २७/८/२०१३ रोजी श्री. अशोक दौलतसिंग परदेशी यांनी प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्र.२४ची मागणी केलेली होती. त्यानुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.२२ दि.४/५/२०१३ रोजी ऑफिस रिपोर्टानुसार गाळा दरमहा भाडे तत्वावर देणेस मंजुरी दिलेली आहे. तथापी प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर हे मनपाने स्वत: बांधलेले आहे ते मा. शासनाच्या अर्थ सहाय्यामधून बांधलेले नाही. त्यामुळे या ठिकाणी असलेल्या गाळयांना घरपट्टी आकारणी केलेली नाही. असे असतांनाही प्रशासनाने गाळा क्र.२४ ला घरपट्टी आकारणी करणेबाबतचा प्रस्तावा पाठविला व तो तसाच मंजूर झालेला आहे. ही बाब अर्जदार यांच्यावर अन्याय करणारी आहे. या शॉपींग सेंटरमधील कोणत्याच गाळयांस घरपट्टी आकारणी होत नसतांना या गाळयांस घरपट्टी आकारणी करणे योग्य नाही. याबाबत अर्जदार माझ्याकडे त्यांच्यावर झालेल्या अन्यथाची व्यथा सातत्याने सांगत आहेत.तरी सदरचे इतिवृत्त कायम करतांना अर्जदार अशोक दौलतसिंग परदेशी यांचे गाळा नं.२४ प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर गाळयाला घरपट्टी आकारणी करू नये व तशी दुरूस्ती मा.स्थायी समिती ठराव क्र.२२ दि.४/५/२०१३ रोजी झालेल्या ठरावाच्या इतिवृत्त कायम करतांना करण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- प्रोफेसर कॉलनी येथील गाळयांना घरपट्टी आकारली जाते का ?

मार्केट वि.प्रमुख श्री. दिवाण :- हो. घरपट्टी ही मालमत्ता कर विभागाकडे आहे.

मा.सभापती साहेब व मा.सौ. खरमाळे सं.र. :- सर्व गाळयांना घरपट्टी आकारली जाते का ?

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- ठरावानुसार आकारली जाते. मला सांगता येणार नाही.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- सगळया गाळयांना घरपट्टी आकारली जाते का ? डोईफोडे साहेब सांगा.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- प्रभाग अधिकारी माहिती सांगा. सगळयाना आकारणी केली पाहिजे.

प्रभाग अधिकारी श्री. साबळे :- सगळया गाळयांना आकारणी करतो.

मा.सभापती साहेब :- सर्वांना घरपट्टी आकारणी केलेली नाही.

प्रभाग अधिकारी श्री. साबळे :- आपण सर्वांना घरपट्टी लावतो पण काही गाळयांना लावली नसेल तर पाहून सांगावे लागेल.

उपायुक्त(सा)डॉ.डोईफोडे:-साबळे तपासणी करून पुढच्या स्टॅडींगला सविस्तर स्वंतत्र्य अहवाल पाठवा.

प्रभाग अधिकारी श्री. साबळे :- विषय माझ्याकडेचा असला तरी सगळया गाळयांना आकारणी लावली पाहिजे तपासून स्वंतत्र्य अहवाल सादर करतो.

मा.सभापती साहेब :- दायमांचा गाळा भाडेबाबतची दुरूस्त काय आहे. याची माहिती सांगा.

मार्केट प्रमुख श्री. दिवाण :- टि.पी. चे काम आहे. आधी दिलेला गाळा व प्रस्तावात द्यायची जागा दोन्ही एकूण भाडे दर्शविले होते. मोजमाप घेवून भाडे निश्चित करून मार्केट विभागाकडे पाठवतात.

मा.सभापती साहेब :- टी.पी. चे कोण आहेत.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- स्थायी समिती ला प्रस्ताव कोण पाठवतो.

मार्केट वि. प्रमुख श्री. दिवाण :- आमचा विभाग

मा.सभापती साहेब :- गैरहजर अधिका-यावर कारवाई करा.

मा.सौ. खरमाळे सं.र.:- स्टॅडींग कमिटी म्हटल्यानंतर सगळया डिपार्टमेंटचे हेड उपस्थित पाहिजे ना ?

उपायुक्त (सा) डॉ. डोईफोडे :- नगरसचिव, अनुपस्थित अधिका-यांवर कारवाई करा.

मा.सभापती साहेब :-दिवाण तुम्ही सविस्तर सगळी माहिती ठेवा.तसेच ठराव क्र.११३ दि.१/६/२०१३ विषयाबाबत माहिती सांगा.

नगररचना विभाग श्री. प्रभुणे :- गाळा भाडे दुरूस्ती ऑफिस रिपोर्ट खालीलप्रमाणे...

नगररचना विभाग दिनांक ८/७/२०१३ रोजी फेरसादर, वर नमुद विषयान्वये कळविण्यांत येते की, मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठरावामध्ये अर्जदार श्री. संजीव बन्सीलाल दायमा यांना ठरवून दिलेले भाडेमुल्य हे अस्तित्वातील बांधकाम व त्यांना सध्या आवश्यक असणा-या व त्यांनी मागणी केलेल्या माकेळी जागा हे दोन्ही एकत्रित धरून नव्याने भाडेआकारणी रक्कम रू.३५३०/-महिना व अनामत रू.४२३६०/-निश्चित केलेली आहे.परंतु सदर भाडेमुल्य ठरवितांना एकूण अर्जदार यांच्या ताब्यात असणारी जागा व त्यांनी मागणी केलेली जागा विचारात घेवून नव्याने भाडे आकारणी इकडील कार्यालयाने प्रतिमहिना ३५३०/-व अनामत रक्कम इतकी केलेली होती. परंतु अर्जदार यांच्या ताब्यात व त्यांना यापुर्वी भाडेतत्वावर २००३ साली देण्यांत आलेली असून सन २०३० पर्यत सदर करारनामा वैध असल्याचे मार्केट विभागाने दिलेल्या कागदपत्रावरून दिसून येते. त्यामुळे आता अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे व नकाशात दर्शविल्याप्रमाणे जागा दयावयाची असल्यास नव्याने येणारे भाडेमुल्य खालीलप्रमाणे.

१] सदर जागेचा शिध्रसिध्दगणकाचा सन २०१३चा दर अंतिम भूखंड क्र.१२८=(विभाग क्र.१५/३) जागेचा दर= ८४९०/- रू. प्रति चौ.मी.,२]आर.सी.सी.बांधकामाचा दर = १०२००/- सदरचे बांधकाम जुने जवळपास ३० वर्षे जुने असल्याने ३०% घसारा धरल्यास १०२००x०.७०% = ७१४० रू. प्रति चौ.मी. उपरोक्त जागेतून मनपास १२% दराने उत्पन्न मिळणे गृहित धरल्यास (७१४०+८४९०) x १२% = १८७५.६०रू. /m२, तसेच इतर खर्च (outgoing) ,दुरूस्ती, देखभाल १५% धरल्यास येणारे भाडे= १८७६/०.८५ = २२०७.०० रू. प्रति चौ.मी. प्रति वर्ष

त्यानुसार येणारे प्रति महिना प्रति चौ.मी. भाडे १८४.०० रू. प्रति चौ.मी. प्रति महिना भाडयाने दयावयाचे क्षेत्र = ३.६८x३.२३m = ११.८९m२ , त्यानुसार येणारे प्रति महिना भाडे = ११.८९x१८४.०० = २१८७.००/- रू. प्रति महिना . **/ब**

सबब प्रति महिना २१८७.०० रू. भाडे व २६,००० रू. अनामत रक्कम आकारणे योग्य घेईल व यापुर्वी दि.११/३/२०१३ रोजीच्या अहवालातील अटी कायम ठेवण्यांत येवून सदर पडीक जागा देण्यांत यावी तसेच यापुर्वी ठरविलेले भाडे मुल्य मा.स्थायी समिती ठराव क्र.११३ दिनांक ०१/०६/२०१३ हे नव्याने जुनी भाडेतत्वावर दिलेली जागा व अर्जदार यांनी मागणी केलेली जागा हे हया दोन्हीचे एकत्रीत नव्याने भाडेमुल्य ठरविलेले आहे व आता ठरविलेले भाडे हे फक्त अर्जदार यांनी मागणी केलेल्या फक्त पडीक जागेबाबतच आहे. त्यामुळे याबाबत दोन्ही पैकी कोणते भाडेमुल्य आकारावे याबाबत तसेच इतिवृत्तात त्याप्रमाणे दुरूस्ती करिता पुढील आदेशार्थ सादर**./अ ,**

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, **"अ"** प्रमाणे मान्य करणेस हरकत नाही., यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, **"अ"** नुसार व **"ब"** नुसार क्षेत्र व रकमे इतका,ठरावानुसार करारनामा करणेस्तव अर्जदार यांना कळविणेस्तव आदेशार्थ सादर., यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मु.ले.प. यांचे अभिप्रायासह सादर करा, यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, वर प्रति महिना रू.२१८७/- भाडे व रू.२६,०००/- अनामत रक्कम ही अर्जदाराने मागणी केलेल्या फक्त पडीक जागेबाबत आहे. नगररचनाकार यांनी याप्रमाणे मान्य करणेस हरकत नाही ही अभिप्राय दिलेला आहे. त्याप्रमाणे मान्यतेस हरकत नसावी., यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, **"अ"** नुसार मान्य.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव पाठवातांना लक्षात आले नाही का ?

नगररचना विभाग श्री. प्रभुणे :- त्यावेळेस नजरचुकीने दोन्ही जागेची एकत्रित भाडयाची आकारणी झालेली आहे. त्यामुळे दुरूस्ती प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- महानगरपालिकेच्या गाळयांना घरपट्टी आकारणी बाबतचा वेगळा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवावा. तसेच दायमा यांचे गाळा भाडे आकारणी ऑफिस रिपोर्टमध्ये नमुद केल्यानुसार आकारणीस दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांस मंजुरी दयावी.

मा.श्री. शेख अरीफ र.:- मागील ठराव क्र.२२ दि. ४/५/२०१३ विषयाबाबत महानगरपालिकेच्या गाळयांना घरपट्टी आकारणी बाबतचा वेगळा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवावा. तसेच ठराव क्र.११३ दि.१/६/२०१३ विषयाबाबत श्री.दायमा यांचे गाळा भाडे आकारणी ऑफिस रिपोर्टमध्ये नमुद केल्यानुसार आकारणीस दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांस मंजुरी दयावी.

मा.सभापती साहेब :-मागील ठराव क्र.२२ दि.४/५/२०१३ विषयाबाबत महानगरपालिकेच्या कोणकोणत्या गाळयांना घरपट्टी केली जाते व कोणत्या गाळयांना आकारणी केली जात नाही. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणेस तसेच मागील ठराव क्र.११३दि.१/६/२०१३ विषयाबाबत श्री.दायमा यांचे गाळयांना फेरसादर ऑफिस रिपोर्टानुसार सादर केलेल्या गाळा भाडेस इतिवृत्तांत दुरूस्तीसह मा.स्थायी समिती सभा क्र.१ दि.८/४/२०१३,सभा क्र.२ दि.४/५/२०१३, सभा क्र.३ दि.१/६/२०१३ व सभा क्र.४ दि.२१/६/२०१३ रोजीचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजूरी दयावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्र-३ दिनांक १/६/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करतांना ठराव क्र.११३ दिनांक १/६/२०१३ सभेत अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्र.४६ शेजारी (पश्चिमेला ३.२x६=१९.२० चौ.मी.) या मोजमापाची जागा अर्जदार श्री. संजीव बन्सीलाल दायमा यांना मालमत्ता कर, विदयुत बिल , इतर कर विरहित जागा भाडेतत्वावर ३ (तीन) वर्षासाठी कराराने दरमहा भाडे रूपये ३५३०/- व अनामत ४२,३६०/- घेउन मनपास भविष्यात प्रकल्पासाठी सदर जागा अर्जदार यांनी ताबडतोब खाली करून दयावी लागेल या अटीवर कराराने देण्यांस मंजूरी दिलेली होती. **त्याऐवजी** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्र.४६ शेजारील असलेल्या जागेच्या मागील मोकळी जागा (३.६८x३.२३= ११.८९चौ.मी.) या मोजमापाची जागा अर्जदार श्री. संजीव बन्सीलाल दायमा यांना मालमत्ता कर, विदयुत बिल , इतर कर विरहित जागा भाडेतत्वावर ३ (तीन) वर्षासाठी कराराने दरमहा भाडे रूपये २१८७/- (रूपये दोन हजार एकशे सत्याऐंशी मात्र) व अनामत रूपये २६,०००/-(रूपये सव्वीस हजार मात्र) घेउन मनपास भविष्यात प्रकल्पासाठी सदर जागा अर्जदार यांनी ताबडतोब खाली करून दयावी लागेल या अटीवर कराराने देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. इतिवृत्तांत या दुरूस्तीसह मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ सोमवार दिनांक०८/०४/२०१३, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२ शनिवार दिनांक०४/०५/२०१३, मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ शनिवार दिनांक ०१/०६/२०१३ व मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०४ शुक्रवार दिनांक२१/०६/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

तसेच ठराव क्र.२२ दि.४/५/२०१३ विषयाबाबत झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या कोणकोणत्या गाळयांना घरपट्टी आकारणी केली जाते व कोणत्या गाळयांना आकारणी केली जात नाही. याबाबतचा सविस्तर स्वतंत्र्य प्रस्ताव सादर करणेत यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- १२३ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

ठराव क्रमांक- १२३ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील औरंगाबाद रस्त्यावरील वन हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. सार्व. बांघकाम विभाग जा.क्र. ३१७ दि.१९/६/२०१३

विषय- फेर टेंडर नोटीस क्र.२ ई - निविदा क्र.१९५ / सन २०११-१२ च्या मंजुरी बाबत

कामाचे नांव :-ई-निविदा क्र.१९५-महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील औरंगाबाद रस्त्यावरील वन हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणे.

उपरोक्त विषयाबाबत खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा. शासन निर्णय क्र. नगरो-२०१०/प्र.क्र.२४२/नवि-३३ मंत्रालय मुंबई-३२ यांचे दि.३१/३/२०११ अन्वये मंजुरी.

२] प्रशासकीय मान्यत रक्कम रू.: ५६४.९१ लक्ष (रस्ता + विद्युत काम)

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. : २,७७,६७,०३२/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची : सा.बां. वि. म.जि. प्रा. २०१०-२०११

५] निविदा (परिशिष्ट "ब") रक्कम रू.: २,७७,६७,०३२/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख : ई- निविदा क्र.१९४ ते १९९ दि.०१/०२/२०१२ दै.पुढारी (ई - निविदेबाबतची सुचना)

७] निविदा विक्री कालावधी : दि.०१/०२/२०१२ ते ०९/०२/२०१२

८] निविदा स्विकारण्याची तारीख : दि.१३/०२/२०१२ ते दि.१६/०२/२०१२ अखेर

९] निविदा उघडण्याची तारीख : दि.२८/०३/२०१२

१०] कामाची मुदत : ९ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देकार |
|---|---|---|
| १ | मे. आर.आर. कपूर, अहमदनगर | १६.१६ % जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने **मे. आर.आर.कपूर,अहमदनगर** यांचा देकार सर्वात कमी म्हणजे **१६.१६%जादा** आहे.निविदा धारकाने भरलेल्या दराची सन २०११-१२ सा.बां.वि.च्या सुधारित चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **१.९०%**जादा येत असुन तो अवाजवी असल्यामुळे दराचे वाटाघाटीसाठी मा.छाननी समिती समोर मा.उपायुक्त(सा)यांचे दालनात दि.२७/०४/२०१२रोजी दु.४.००वाजता समक्ष उपस्थित राहणे अथवा अंतीम दराबाबत लेखी पत्र सादर करणेबाबत जा.क्र.सा.बां.वि.९६/१ दि.२६/०४/२०१२अन्वयें पत्र दिले होते.त्यानुसार दि.२७/०४/२०१२

रोजी समक्ष दिलेल्या पत्रानुसार मजुरीचे दर,मटेरीयलचे दर तसेच डांबराचे दर, डिझेलचे दर इत्यादी वाढलेले आहेत. त्यामुळे आम्ही सादर केलेले दर हे योग्य असुन कमी करणे शक्य नाही. तरी सदरच्या कामाचा कार्यारंभ आदेश लवकारात लवकर मिळावा अशा आशयाचे पत्र सादर केले आहे.

सदरचा तुलनात्मक तक्ता मा.छाननीसमोर दि.२७/४/२०१२रोजी ठेवला असता मा.छाननी समितीने उपरोक्त निविदेबाबत निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणे शिफारस केली आहे.

**मे.आर.आर.कपूर** यांनी सदरचे काम निविदा दरापेक्षा **१६.१६%** जादा दराने करणेस दि.२७/४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये तयारी दर्शविली असुन सन २०११-२०१२ सा.बां.वि.च्या चालु दरसुचीशी तुलना करता सदरचा दर **१.९० % जादा** येत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.३,२२,५४,१८४/- |
| १३ | चालु दरसुची सा.बां.वि.च्या २०११-१२अनुसार कामाची अद्यावत किंमत | रू.३,१६,५१,२६१/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू. ६,०२,९२३/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (१४ x १००) / १२ | १.९०% जादा |

तरी मा.छाननी समितीने उपरोक्त निविदेबाबत निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेबाबत शिफारस केल्यानुसार सदरची निविदा मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव पाठविणेस मा.आयुक्त यांनी दि.१८/०५/२०१२ रोजी मान्यता दिल्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर इकडील जा.क्र. २६३ दि.२९/०५/२०१२ अन्वये निर्णयास्तव सादर केली. तद्नंतर विषयांकित कामाचे ठेकेदार मे.आर.आर. कपूर यांनी कामअचा कार्यारंभ आदेश मिळाला नसल्याने तसेच सदरच्या निविदेची मुदत संपल्याचे नमुद करून उपरोक्त कामापोटी भरलेली बयाना रक्कम परत करणेस मा.आयुक्त यांचे नांवे अर्ज करून त्याची प्रत मा.सभापती, स्थायी समिती , अहमदनगर महानगरपालिका यांना सादर केली असता मा.सभापती, स्थायी समिती यांनी उपरोक्त अर्जावर "मा. नगरसचिव तातडीने सदरचा प्रस्ताव मा.शहर अभियंता यांचेकडे नियमानुसार कार्यवाही करीता परत पाठवा" असा आदेश देउन मा. नगरसचिव यांचे मार्फत त्यांचेकडील जा.क्र. १९८ दि.१०/८/२०१२ अन्वये पाठविला असता तो डिसेंबर २०१२ मध्ये प्राप्त झाला. उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती, अहमदनगर महानगरपालिका यांनी कोणताही निर्णय घेतला नसल्याने सदर निविदेबाबत निर्णयास्तव तथा आदेशास्तव अहवाल दि.२३/०१/२०१३ फेरसादर केला असता सदर प्रस्तावावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी दि.२२/०३/२०१३ रोजी "सदर कामाची आवश्यकता आहे किंवा नाही याबाबत शहर अभियंता यांनी आपले स्पष्ट मत द्यावे." असा शेरा दिला असता त्यावर शहर अभियंता यांनी "मुख्य लेखापरिक्षक यांचा शेरा गैरलागू आहे.महापालिकेने सर्व कार्यवाही नियमाप्रमाणे करूनच सदर काम मंजूर केलेले आहे. आज मितीस लोक प्रतिनिधी तसेच स्थानिक जनतेची अपेक्षा लक्षात घेउन रस्त्याचे काम करणे उचित होईल सविनय सादर" असे मत दि.३०/०३/२०१३ रोजी दिले.तद्नंतर उपरोक्त प्रस्तावावर मा.उपायुक्त (सा.) यांनी दि.१७/०४/२०१३ रोजी " अहवालासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता संबंधित कंत्राटदाराने मा.आयुक्त यांना संबोधित केलेले पत्र आढळुन येत नाही. स्थायी समितीस दिलेल्या प्रतीवर सदरील अहवाल ठेवण्यात आला आहे मुळ पत्र चे

मागणी अवलोकन न करता अहवाल सादर करणे योग्य नाही. कंत्राटदाराच्या मागणीनुसार विहीत वेळेत निविदा मंजुरीची कार्यवाही न झाल्याने बयाना रक्कमेची मागणी आहे.वस्तुत:निविदा प्रक्रिया पुर्ण करून मा.स्थायी समिती कडे प्रस्ताव दि.२९/५/१२ रोजीचे सादर करण्यात आला आहे. मा.स्थायी समितीने याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही. सबब अधिनियमाच्या सुधारणेनुसार नगर सचिव यांनी विहीत कालावधीत निविदा मंजुरीसाठी कार्यवाही करणे आवश्यक होते किंवा विहित मुदतीनंतर सुधारणेनुसार प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविणे आवश्यक होते. त्यायोगे निर्णय घेणे शक्य झाले असते. सद्यस्थितीत बयाना रक्कम परत करणेबाबत निविदा अटी शर्तो तपासुन तसेच निविदा मंजुरी बाबत शहर अभियंता यांनी स्वयंस्पष्ट अभिप्राय देणे अपेक्षित आहे. तथापी सदरील प्रकरणी आदेशार्थ सादर. असा अभिप्राय दिला असता त्यावर मा.आयुक्त यांनी दि.३०/०४/२०१३ रोजी " या संदर्भात उपायुक्त (सा.)+ शहर अभियंता यांनी तात्काळ चर्चा करावी." असा आदेश दिला असता " मा.आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे दि.३०/०४/२०१३ रोजी मा. नगररचनाकार यांचे समेवेत सदर रस्त्याची पाहणी केली असता असे आढळुन आले कि रस्त्याचा सुरूवातीचा भाग म्हणजे Top Up petrol Pump ते हनुमान मंदिर हा भाग जुन्या गांवठाणातील असुन त्याठिकाणी रस्ता अरूंद आहे.( ४ ते ५ मी.) सदर भाग वगळता सर्व ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे रूंदी मिळु शकते त्याप्रमाणे ठेकेदाराशी देखील चर्चा केली व ते देखील काम करण्यास तयार आहेत. ठेकेदारांचा लेखी होकार स्वतंत्रपणे जोडण्यात येईल सदर काम हाती घेणे शक्य आहे. मान्यतेसाठी सादर असा अहवाल मा. शहर अभियंता यांनी दि.२०/०५/२०१३ रोजी दिल्यानंतर मा.उपायुक्त (सा) यांनी संबंधित ठेकेदाराची लेखी संमती घेउन सदरील निविदा पुनश्च मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर. असा दि.०६/०५/२०१३ रोजी अभिप्राय दिला. त्यावर मा.आयुक्त यांनी दि.०९/०५/२०१३ रोजी मान्यता दिल्यानुसार संबंधित ठेकेदार यांना लेखी संमती पत्र देणेस सांगितले असता मे.आर.आर. कपुर यांनी दि.३१/०५/२०१३रोजी इकडेस लेखी पत्र देउन सदरचे काम निविदा दरापेक्षा १६.१६% जादा दरानेच करणेस तयार असलेबाबत संमती दिली आहे. त्यानुसार सदरची निविदा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत हद्दीतील औरंगाबाद रस्त्यावरील वन हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणे विषयी प्रस्ताव आहे. माजी सभापती स्था.स. मा.श्री. संजय गाडे यांनी विषय घेणेबाबत यादी दिलेली आहे.

मा. श्री. भोसले ग.पुं. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवला व माहिती दिली. दि.१/२/२०१२ रोजी टेंडर काढले या कामाची मुदत ९ महिने ठेवली आहे. ठेकेदाराने उपायुक्तांच्या दालनात झालेल्या बैठकीत सांगितले की दर बरोबर आहेत. कमी करणे शक्य नाही. ठेकेदारास कार्यादेश देण्याचा व्हॅलिडीटी पिरीयड ९० दिवस असतो. त्यात आदेश दिला नाही तर तो नाकारतो.

त्यानुसार त्याने बयाना रकमेची मागणी केली होती. ठेकेदाराला समक्ष भेटून ॲनालिसीस करून सांगितले. ठेकेदाराला परत बोलावून विचारणा केली. या रस्ताबाबत पेट्रोल पंप ते मस्जिद पर्यत ३०० मिटरचा रस्ता मिळत नाही. फकिरवाडा हा भाग जुने गावठाण असल्याने रूंदी मिळत नाही. परंतु पुढे रस्ता रूंदी मिळत असल्याने काम करणेस हरकत नाही. त्यामुळे दि.६/५/२०१३ रोजी ठेकेदाराने परत पत्र दिले की त्याच पुर्वीच्या दराने तो काम करायला तयार आहे. ठेकेदाराने लेखी दिले आहे काम करतो म्हणून आयुक्त साहेबां समोरही तो समक्ष बोलला आहे.

मा.सभापती साहेब :- जर फाईल खाली पाठवली तर टपाल कोण घेतो. ही फाईल खाली पाठवली असता घेण्यात आली नाही.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- टेंडर क्लार्क टपाल घेतो. त्याच्यावर कारवाई करून आयुक्तांकडे रिपोर्ट करतो.

मा.सभापती साहेब :- आवक जावक टपाल लिपिकाकडे येणारे व जाणा-या टपालबाबतचाही सविस्तर अहवाल मा.आयुक्त साहेबांकडे पाठवा. फाईल न घेणा-यावर कारवाई करा.

शहर अभियंता श्री.कुलकर्णी :- टपाल व फाईल घेण्याची सूचना देण्यांत येईल.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- ठेकेदार बोलावा.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- काम करण्यास तयार असल्याचे पत्र दिले आहे.

मा.सभापती साहेब :- नियमानुसार काय आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- पत्र ठेकेदाराने दिले आहे का ?

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- होय.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- वाचून दाखवा.

याप्रमाणे पत्र वाचून दाखवाले.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- यापुर्वी काय होते.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- पुर्वी प्रस्ताव स्थायी समितीकडे आला होता. स्टॅडींग कमिटीमध्ये विषय घेतला गेला नाही. ठेकेदाराने सभापतीनां पत्र दिले काम करायला तयार नाही. सर्व रेट मध्ये वाढ झाल्याने काम या दरात परवडत नाही. म्हणून प्रस्ताव परत पाठवला. आता पुन्हा सादर केला. त्या काळातल्या दरामध्ये तो काम करायला तयार आहे. त्याला पैसे वाढवून दयायचे नाही. तसे दि.३१/५/२०१३ रोजी पत्र दिले आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- परत टेंडर केले तर

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- जास्त दर येईल आणि आजही तो त्याच दराने काम करण्यास तयार असलेबाबत पत्र दिले आहे. मटेरियलचे रेट पुर्वीपेक्षा जास्त वाढलेले आहेत.डांबराच्या दर पुर्वी दहा हजार होता. आता तो तेवीस हजार आहे.मजुराचे दर वाढलेले आहेत. त्यामुळे फेर टेंडर केले तर महानगरपालिकेचे नुकसान होईल व ऑडीट पाईंट निघू शकतो. याचा विचार होणे आवश्यक आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- १६% खुप होते.कमी करायला लावा व काम द्या.

शहर अभियंता श्री. कुलकर्णी :- ठेकेदारास आज बोलवले आहे.

मा.सभापती साहेब :- आजच्या दरातील वाढ विचारात घेता महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने मंजुरी दयावी.

मा.श्री. शेख अरिफ र. :- मुकुंदनगर परिसराचा विकास होणे गरजेचे असल्याने व त्याच दरात ठेकेदार काम करणेस तयार आहे. त्यामुळे ऑफिस रिपोर्टास मंजुरी दयावी.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- ऑफिस रिपोर्टास मंजुरी दयावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. तसेच फाईल व टपाल घेत नसलेल्या आवक जावक कर्मचा-यांवर तात्काळ कार्यवाही प्रस्तावीत करून केलेल्या कारवाईची प्रत इकडेस माहितीस पाठवावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील औरंगाबाद रस्त्यावरील वन हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-यापर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार तसेच निविदा धारक यांनी दिनांक ३१/५/२०१३ रोजी दिलेल्या पत्रानुसार निविदा धारक मे.आर.आर. कपूर , अहमदनगर यांना निविदा दरापेक्षा १६.१६% जादा दराने देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

तसेच फाईल व टपाल घेत नसलेल्या आवक जावक कर्मचा-यांवर तात्काळ कार्यवाही प्रस्तावीत करून केलेल्या कारवाईची प्रत इकडेस माहितीस पाठवावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. शेख आरिफ शेख रफिउद्दीन सही /-

अनुमादेक :- मा.सौ. खरमाळे संगीता रत्नाकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- १२४ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

ठराव क्रमांक- १२४ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र./वर्क. ८२ दि.१२/७/२०१३

संदर्भ : इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग १०० दि.२१/६/२०१३ अन्वयेच्या प्रस्ताव.

विनंती की, इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र.इलेक्ट्रीक विभाग १०० दिनांक २१/६/२०१३ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये "आस्थापना विभाग ८१४९ दिनांक ११/१२/२०१२ अन्वये विद्युत विभागा करिता (सावेडी ,शहर,फकिरवाडा ,नागापुर,बोल्हेगांव,केडगांव) पथदिवे दैनंदिन मेन्टेन्स करिता अपुर्ण कर्मचारी संखेमुळे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर ६ महिने करिता १० वायरमन यांची नियुक्ती झालेली असुन दिनांक १७/१२/२०१२ रोजी ८ वायरमन कामावर हजर असुन अद्याप कार्यरत आहे. तरी सदरचे वायरमन कर्मचारी हे व्यवस्थी कामे पार पाडत असुन मा.नगरसेवक तसेच नागरिकांचे तक्रारीचे वेळीच निवारण होण्यास मदत होत आहे.त्यामुळे मा.नगरसेवक व नागरिकांच्या तक्रारीचे स्वरुप कमी झालेले आहे.तरी संबधीत वायरमन यांची दि.१७/६/२०१३ रोजी ६ महिन्याचा कालावधी पुर्ण होत आहे.सध्याचे पावसाळयाचे दिवस येत असल्याने नेहमीच्या कामाच्या व्यतिरिक्त आपत्कालीन दुर्घटनेस कर्मचारी वर्गाची अत्यंत आवश्यकता असुन कामात अखंडपणा राहणे आवश्यक आहे.तरी संबधीत आठ वायरमन यांची पुढील कालावधीकरिता ६ महिने अथवा अधिक काळ तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर मुदतवाढ देण्यास आस्थापना विभागास आदेशीत व्हावे ."असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

सदर प्रस्तावा सोबत यापुर्वी इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नियुक्ती केलेल्यांची यादी जोडलेली आहे.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र.२२६ दि.२२/१०/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करुन इलेक्ट्रीक विभागामध्ये वायरमनची संख्या अपुरी असल्याने दैनंदिन कामकाजामध्ये अडचणी निर्माण होत असल्याने कंत्राटी पध्दतीने अथवा इतर पर्यायांचा विचार करुन १० वायरमन तात्काळ उपलब्ध करुन देणे बाबत सुचित केलेले होते.

त्यानुषंगाने दिनांक २५/१०/२०१२ अन्वये आस्थापना विभागा मार्फत प्रस्ताव सादर करुन सदरच्या प्रस्तावाच्या मान्यतेच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे रु.६०००/- या दरमहा मानधनावर सहा महिन्या करीता करारबध्द नियुक्तीसाठी दिनांक ३०/१०/२०१२ रोजीच्या दैनिक पुढारी व दिनांक २७/१०/२०१२ रोजीच्या दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये थेट पध्दतीने **( Walk In Interview)** नुसार उमेदवारांच्या दि.७/११/२०१२ रोजी मुलाखती आयोजीत केल्या बाबत वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देण्यात आलेल्या होत्या.

सदर प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने दि.७/११/२०१२ रोजी मा.आयुक्त तथा अध्यक्ष ,निवड समिती ,अ.नगर महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली मा.निवड समिती यांनी थेट पध्दतीने उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेवुन पात्र ठरवुन उमेदवारांची निवड व प्रतिक्षा सुचीवर निवड केलेली होती.

सदर निवड झालेल्या उमेदवारांची इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर संबधितांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणुक ८१४९ दि.११/१२/२०१२ अन्वये इलेक्ट्रीक विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती.

आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणुक ८१४९ दि.११/१२/२०१२ अन्वये सदर आदेशान्वये त्यांची सदर केलेल्या कंत्राटी करारा नुसार सहा महिन्याच्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीची मुदत ही दिनांक १०/६/२०१३ रोजी समाप्त झालेली आहे.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र.२२६ दि.२२/१०/२०१२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी सहा महिन्या करीता दरमहा रु.६०००/- या मानधनावर अटी व शर्ती नुसार संबधीतांची इलेक्ट्रीक विभागामध्ये केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव जा.क्र.आस्था./वर्क.२६२ दि.२२/२/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५ दिनांक ८/४/२०१३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करुन मंजुरी दिलेली आहे.

"अहमदनगर महानगरपालिकेचे विद्युत विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदामवर ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद उमेदवारांची अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

सद्यस्थितीमध्ये पावसाळयाचे दिवस असल्याने आपत्कालीन परिस्थितीमध्ये दक्षता घेवून नागरिकांना तातडीने सेवा उपलब्ध करुन देणे बाबत मा.शासनाने याबाबत सुचना केलेल्या आहेत.

तसेच जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणुक८१४९दि.११/१२/२०१२अन्वये केलेल्या करार बध्द नियुक्ती आदेशामधील श्री.काटकर लंकेश तुकाराम यांची सदर आदेशामधील अटी व शर्ती नुसार केलेल्या सहामहिन्याच्या मानधनावरील करारबध्द नियुक्ती कालावधीमध्ये त्यांचे पुर्वचारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र इकडेस प्राप्त न झाल्याने पुनश्चः सदर कंत्राटी करारबध्द नियुक्ती आदेशामध्ये अटी व शर्ती मध्ये त्याप्रमाणे तसे नमुद करुन श्री.काटकर लंकेश तुकाराम यांचे पुर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र पाठविणे बाबत मा.पोलिस अधिक्षक,अहमदनगर यांचे कार्यालयास तसे पत्र पाठविणे आवश्यक होईल.

सद्यस्थितीमध्ये इलेक्ट्रीक विभागामध्ये कायम आस्थापना सुचीवरील वायरमन यापदांची मंजुर पद संख्या अत्यंत कमी प्रमाणात आहे. इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचे संदर्भिय जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग १००दि.२१/६/२०१३च्या प्रस्तावामध्ये नमुद केल्यानुसार सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने नेहमीच्या कामाच्या व्यतिरिक्त आपत्कालीन दुर्घटनेस कर्मचारी वर्गाची अत्यंत आवश्यकता असून कामात अखंडपणा राहणे आवश्यक आहे. असे नमूद करून सुचित केलेले असल्यामुळे खास बाब म्हणुन इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेचा तातडीने विचार होवून खालील तक्त्यांत दर्शविलेल्याप्रमाणे

कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन या पदी तांत्रिक खंड देवून दिनांक १०/०७/२०१३ पासून सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र. आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणुक २१०८ दि. ८/७/२०१३अन्वये इलेक्ट्रीक विभागामध्ये करारबध्द नियुक्ती केलेली आहे.

| अं. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणूक जा.क्र.व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ६,०००/- | २१०८ दि. ८ / ७ / २०१३ |
| २ | लांढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ६,०००/- | २१०८ दि. ८ / ७ / २०१३ |
| ३ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | ६,०००/- | --//-- |
| ४ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ६,०००/- | --//-- |
| ५ | सय्यद शोएब जावेद | वायरमन | ६,०००/- | --//-- |
| ६ | देवरे गितेश आणासाहेब | वायरमन | ६,०००/- | --//-- |
| ७ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ६,०००/- | --//-- |
| ८ | झिरपे विशाल विक्रम | वायरमन | ६,०००/- | --//-- |

तरी इलेक्ट्रिक विभाग प्रमुख यांच्या उपरोक्त संदर्भिय जा. क्र. इले. विभाग १०० दि.२१/६/२०१३ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रिक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी वरिल तत्क्यांत दर्शविलेल्या संबंधितांची तांत्रिक खंड देवून दि.१०/०७/२०१३पासुन सहा महिन्या करिता दरमहा रूपये ६०००/-(रूपये सहा हजार मात्र )या मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे इलेक्ट्रिक विभागामध्ये जा.क्र.आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणुक २१०८दि.८/७/२०१३ अनवये मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब,मा.उपायुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी वायरमन यापदी नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार ऑफिस रिपोर्टमध्ये नमुद तसेच जा.क्र.आस्था. कंत्राटी करारबध्द नेमणूक २१०८ दिनांक ८/७/२०१३ अन्वये वायरमन यापदी दिनांक १०/७/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये ६०००/-(रूपये सहा हजार मात्र) या मानधनावर अटी व शर्तीनुसार तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

अनुमोदक :-मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- १२५ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

ठराव क्रमांक- १२५ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्यास्वरूपात वैद्यकीयअधिकारी यापदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची अटी व शर्तीप्रमाणे सहा महिन्याकरीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र./वर्क. ८३ दि.१६/७/२०१३

संदर्भ : १) डॉ.सुरेश विलास घोलप यांचा दिनांक २१/५/२०१३ अन्वयेचा अर्ज.

२) मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ४६ दि.१८/६/२०१३ अन्वयेचा प्रस्ताव.

सादर,

विनंती की,मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ४६ दि.१८/६/२०१३ अन्वये इकडेस प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने अहमदनगर शहरामध्ये फिरता दवाखाना सुरु करण्यात आलेला आहे.सदर फिरत्या दवाखान्यामुळे दारिद्रय रेषेखालील व गलीच्छ वस्तीत जाऊन आरोग्य बाबत जनजागृती व नागरीकांना आरोग्य सेवा पुरविली जाते.सदरच्या फिरत्या दवाखान्या करीता डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची जा.नं.आस्था./कंत्राटी करार नेमणुक ८३९६ दि.२८/१२/१२ अन्वये सहा महिन्या करीता वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी करार पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली होती.सदर आदेशाची मुदत दिनांक २८/०६/२०१३ रोजी संपुष्टात येत आहे.त्यांनी संदर्भ क्र.२ नुसार पुढील सहा महिन्या करीता पुनर्नेमणुक करण्ेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. तसेच त्यांनी आत्ता पर्यत केलेल्या कामाचा तपशील सोबत जोडुन दिलेला आहे.अहमदनगर महानगरपालिकेत वैद्यकीय अधिका-याची संख्या अपुरी आहे.त्यामुळे फिरत्या दवाखान्या करीता वैद्यकीय अधिका-याची आवश्यकता आहे.वरील कालावधीत व याआधी दिलेल्या नेमणूकीच्या कालावधीत डॉ.सुरेश विलास घोलप यांचे काम समाधानकारक आहे.तरी त्यांना नियमाप्रमाणे पुनर्नेमणुक देणेस शिफारस आहे.तथापि आदेशार्थ सादर."असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी ,कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह जा.क्र.८०२ दिनांक २७/११/२०१२ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणुक ८३९६दि.२८/१२/२०१२ अन्वये दिनांक २९/१२/२०१२पासुन सहा महिन्या करिता दरमहा रु.२०,०००/- या मानधनावर कै.बा.दे.दवाखाना येथे करारबध्द नेमणुक करण्यात आलेली आहे.

डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची फिरता दवाखाना करीता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी कंत्राटी करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर सदर केलेल्या सहा महिन्याच्या करारबध्द कालावधीतील नियुक्तीची मुदत ही दि. २८/०६/२०१३ रोजी समाप्त होत आहे.

सदर कै.बा.दे. दवाखाना व सुतीकागृह ८०२दि.२७/११/२०१२च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अ.नगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी डॉ.सुरेश विलास घोलप यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणुक८३९६दि.२८/१२/२०१२अन्वये तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी करारबध्द नेमणुक आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे दि.२९/१२/ २०१२ पासुन सहा महिन्या करीता केलेल्या कंत्राटी करारबध्द मानधनावरील नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव जा.क्र.आस्था.२४६ दिनांक ४/१/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.सदरच्या कालावधीतील अटी व शर्ती प्रमाणे डॉ.सुरेश विलास घोलप यांची केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीच्या प्रस्तावास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ७९ दिनांक २४/०१/२०१३ अन्वये ठराव पारीत होवुन कार्योत्तर मंजुरी मिळालेली आहे.

तरी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी ,कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह यांचे उपरोक्त संदर्भिय क्र.२ च्या जा.क्र.कै.बा.दे.दवा.व सुतिका गृह ४६ दिनांक १८/६/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता डॉ.श्री.सुरेश विलास घोलप यांची कंत्राटी करारा प्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी जा.क्र.आस्थापना / कंत्राटी करारबध्द नेमणुक २२४३ दि.१५/७/२०१३ अन्वये दिनांक १६/०७/२०१३ पासुन सहा महिन्या करीता रुपये २०,०००/- (रु.वीस हजार मात्र) या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३ दिनांक ३०/४/२०१० अन्वयेच्या पारीत झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने मा.आयुक्त साहेब मा.उपायुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी वैद्यकीय अधिकारी यापदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीयअधिकारी यापदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची अटी व शर्तीनुसार जा.क्र. आस्थापना /कंत्राटी करारबध्द नेमणूक २२४३ दि.१५/७/२०१३ अन्वये दिनांक १६/७/२०१३ पासून सहा महिन्याकरीता रूपये २०,०००/-(रूपये वीस हजार मात्र) या दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

अनुमोदक :-मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- १२६ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

ठराव क्रमांक- १२६ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार १] डॉ.श्री. बाळासाहेब देवकर,२] डॉ.श्री.पी.आर.टेकवाणी, ३] डॉ.सौ.मिनाक्षी करडे , ४] डॉ.श्री. अमित करडे,५] डॉ.सौ. मृणाल वाघ, ६] डॉ.सौ. रूपाली झावरे,७] डॉ.सौ. कांचन रच्चा,८] डॉ.सौ.रूपाली शेळके/नेमाणे यांची तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टरांची दिनांक ९/५/२०१३ पासून दि.८/५/२०१६ अखेर तीन वर्षाकरीता व्हीजीट बेसवर अटी व शर्तीप्रमाणे पॅनलशिपवर करारबध्द नियुक्तीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग दि.१४/६/२०१३

संदर्भ : कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह जा.क्र.२६१ दि.११/६/२०१३अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी ,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील कै.बा.दे.दवा.व सुतीका गृह जा.क्र.२६१ दि.११/६/२०१३ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " कै. बा. दे. दवा. सुतिका गृह येथील रूग्णांची स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरां अभावि गैरसोय होउ नये म्हणून शहरातील इच्छूक व अनुभवी स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टरांची प्रत्येक भेटीस (व्हीजीट फी) रूपये २००/- तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस (सर्जन फी) रू.१०००/- याप्रमाणे फी देवून पॅनल शिपवर सहा महिन्याकरिता नेमणूक करण्यात आलेली होती. सदरच्या स्त्रीरोगतज्ञांच्या पॅनलची मुदत दिनांक ८/०५/२०१३ रोजी संपणार आहे. सदरची नेमणूक ही कुठल्याही प्रकारची स्थायी अथवा अस्थायी नेमणूक नसुन दवाखान्यामध्ये सिझेरीयन शस्त्रक्रियेस आवश्यकता भासल्यास त्यांना कॉल करून शस्त्रक्रियेनुसार फी अदा केली जाते. तसेच पॅनलची नेमणूक केल्यानंतर एखादा स्त्रीरोगतज्ञांनी पॅनलमध्ये नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केल्यास त्यांच्या अर्जाचा विचार करून प्रस्ताव ठेवून नियमाप्रमाणे पॅनलमध्ये त्यांना समाविष्ट करण्यात येईल. तरी हॉस्पीटलच्या दृष्टीने इमर्जन्सीच्यावेळी व दवाखान्यामध्ये काही कारणाने स्त्रीरोगतज्ञ उपलब्ध नसल्यास दवाखान्यामध्ये रूग्ण दाखल करून घेणे धोक्याचे होईल व त्यामूळे हॉस्पीटल मध्ये दाखल होणा-या रूग्णांच्या संख्येवर परिणाम होण्याची दाट शक्यता लक्षात घेता हॉस्पीटल व रूग्णांच्या दृष्टीने स्त्रीरोगतज्ञाची पॅनलशिपवर नेमणूक करणे गरजेचे आहे. तरी कै. बा. दे. दवाखान्यातील रूग्णांची स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरां अभावि गैरसोय होवू नये म्हणून सोबतच्या यादीतील शहरातील इच्छुक व अनुभवी स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टरांची प्रत्येक भेटीस (व्हीजीट फी) रू. २००/- तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस (सर्जन फी) रू.१०००/- या प्रमाणे फी देवून दि.९/५/२०१३ पासून दि.८/५/२०१६ अखेर तीन वर्षाकरिता पॅनल शिपवर नेमणूक करणेकामी प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणेस आदेशार्थ सविनय सादर." असे नमुद करुन सुचित केलेले आहे. (सोबत यादी जोडलेली आहे.)

सदरच्या सोबत जोडलेल्या यादी मध्ये खालील प्रमाणे डॉक्टरांचे नांव नमुद केलेली आहेत.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| १ | डॉ.श्री.बाळासाहेब देवकर |
| २ | डॉ.श्री.पी.आर.टेकवाणी |
| ३ | डॉ.सौ.मिनाक्षी करडे |

| | |
|---|---|
| ४ | डॉ.श्री.अमित करडे |
| ५ | डॉ.सौ.मृणाल वाघ |
| ६ | डॉ.सौ.रुपाली झावरे |
| ७ | डॉ.सौ.कांचन रच्चा |
| ८ | डॉ.सौ.रुपाली शेळके / नेमाणे |

सदरच्या प्रस्तावावर मा.प्र.आरोग्याधिकारी यांनी प्रस्तावित 'अ' प्रमाणे स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांचे आवश्यकते नुसार व प्राप्त अर्जानुसार पॅनेल तयार करणे उचित वाटते तरी मान्यतेस्तव व आस्थापना विभागास कार्यवाहीस्तव तथापि आदेशार्थ सादर.असे नमुद असुन शिफारस करुन सुचित केलेले आहे.

यापुर्वी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह जा.क्र.७२८दि.२९/१०/२०१२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अत्यावश्यक सेवेचा तातडीने विचार होवुन अंतर्गत खास म्हणुन कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे पॅनलशिपवर कंत्राटी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टरांची व्हीजीट बेसवर पॅनलशिपवर सेवेसाठी अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती जा.क्र.आस्था.४६८९ दि.९/११/२०१२ अन्वये प्रत्येक भेटीस (व्हिजीट फी)रु.२००/-तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस (सर्जन फी)रु.१०००/-याप्रमाणे १. डॉ.श्री.बाळासाहेब देवकर २. डॉ.श्री.पी.आर.टेकवाणी ३. डॉ.श्री.मिनाक्षी करडे ४. डॉ.श्री.अमित करडे ५. डॉ.सौ.मृणाल वाघ ६. डॉ.सौ.रुपाली झावरे ७. डॉ.सौ.कांचन रच्चा यांची सहा महिन्या करीता कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदरची संबधितांची पॅनलशिपवर व्हिजीट बेसवर सेवेसाठी केलेली अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द नियुक्तीची मुदत ही दिनांक ८/५/२०१३ रोजी समाप्त झालेली आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेलः

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२)पोट-कलम(१)मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त,नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र,कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ."असे नमुद केलेले आहे

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवाखाना यांचे उपरोक्त संदर्भिय जा.क्र.२६१ दिनांक ११/६/२०१३ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने व सदर प्रस्तावावरील मा.प्र.आरोग्याधिकारी यांचे शिफारशी नुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तातडीने अत्यावश्यक सेवेचा विचार होवून अंतर्गत खास बाब म्हणुन कंत्राटी करारा नुसार १. डॉ.श्री.बाळासाहेब देवकर २. डॉ.श्री.पी.आर.टेकवाणी ३. डॉ.सौ.मिनाक्षी करडे ४. डॉ.श्री.अमित करडे ५. डॉ.सौ.मृणाल वाघ ६. डॉ.सौ.रुपाली झावरे ७. डॉ.सौ.कांचन रच्चा ८.डॉ.सौ.रुपाली शेळके / नेमाणे यांची तात्पुरत्या स्वरुपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टर म्हणुन दिनांक ९/५/२०१३ पासुन ८/५/२०१६ अखेर तीन वर्षा करीता प्रत्येक भेटीस (व्हिजीट फी) रु.२००/- तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस (सर्जन फी) रु.१०००/- याप्रमाणे अटी व शर्ती प्रमाणे पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती बाबत निर्णय झाल्यास सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मंजुरी मिळणे करीता निर्णयासाठी पाठवावा लागेल.

तरी याबाबत मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर. / **अ**

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प. आणि मु.ले. अ. यांचा अभिप्राय घेणे.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मुख्य लेखा अधिकारी अभिप्राय द्या.

यावर मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की,"अ"प्रमाणे प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवावा.

यावर उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की , प्रस्तावीत केलेनुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टरांची व्हीजीट बेसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्ती विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- रूग्णांना दर्जेदार व चांगल्या सुविधा उपलब्ध होणे गरजेचे असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार १] डॉ.श्री. बाळासाहेब देवकर,२] डॉ.श्री.पी.आर.टेकवाणी, ३] डॉ.सौ.मिनाक्षी करडे , ४] डॉ.श्री. अमित करडे,५] डॉ.सौ. मृणाल वाघ, ६] डॉ.सौ. रूपाली झावरे,७] डॉ.सौ. कांचन रच्चा,८] डॉ.सौ.रूपाली शेळके/नेमाणे यांची तात्पुरत्या स्वरूपात स्त्रीरोग तज्ञ (Gynaecologist) डॉक्टरांची दिनांक ९/५/२०१३ पासून दि.८/५/२०१६ अखेर तीन वर्षाकरीता प्रत्येक भेटीस (व्हिजीट फी) रू.२००/- (रूपये दोनशे मात्र)तसेच प्रत्येक सिझेरीयन शस्त्रक्रियेस (सर्जन फी) रू.१०००/- (रूपये एक हजार मात्र) याप्रमाणे अटी व शर्ती नुसार व्हीजीट बेसवर पॅनलशिपवर करारबध्द नियुक्तीस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अनिल वसंतराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- १२७ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

ठराव क्रमांक- १२७ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्रमांक- ३९ हा अर्जदार सौ. मनिषा अक्षय भळगट, रा. प्रोफेसर कॉलनी, सावेडी,अ.नगर यांना जागा भाडेतत्वावर दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन लाईट बील मालमत्ता कर स्वतंत्र घेवून देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. मार्केट विभाग जा.क्र. १५० दि.२४/७/२०१३

संदर्भ :- सौ. मनिषा अक्षय भळगट यांचा दिनांक ९/७/२०१३ रोजीचा अर्ज

उपरोक्त संदर्भाधीन विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, प्रोफेसर कॉलनी म्युनसिपल कॉम्पेक्स मधील गाळा क्र.३९ व्यवसायाकरीता मला मिळावा . सदरचा गाळा गेले १० वर्षापासुन बंद आहे. सदरचा गाळा मला भाडेतत्वावर मिळाल्यास म.न.पास उत्पन्न मिळेल व माझ ाही उदरनिर्वाह होईल. सदरच्या गाळया संबंधी सर्व अटी व शर्तीचे मी काटेकोरपणे पालन करील. असा दिनांक ९/८/२०१३ रोजीचा अर्ज मार्केट विभागास प्राप्त झालेला आहे.

प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्र.३९ हा पुर्वी वसुली विभाग मनपा कार्यालयाच्या ताब्यात असल्याचे टाचन रजिस्टर पाहाता आढळून येते तद्नंतर सदरचा गाळा मोटार व्हेईकल विभागाच्या ताब्यात असल्याचे समजते अर्जदार यांचे मागणीप्रमाणे सदरचा गाळा भाडेतत्वावर दयावयाचा झाल्यास मॅकेनिकल इंजिनिअर यांजकडून अभिप्राय घेउन पुढील कार्यवाही करणेबाबत रिपोर्ट आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, M.E. अभिप्राय दयावा.

यावर मो.व्हे. विभाग यांचा अभिप्राय की, मा.सादर विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मी मा.मॅकेनिकल इंजि. यांच्या तोंडी आदेशानुसार सदर प्रकरणी गाळा क्र.३९ ची प्रत्यक्ष पहाणी केली असता सदर ठिकाणी सदर गाळयास शटर लावलेले असुन त्यास कुलूप लावलेले आहे.परंतु शटरच्या फटीतुन आत डोकावून पाहीले असता गाळा क्र. ३९ हा पुर्णतः मोकळा आहे त्यामध्ये सामान वगैरे काही नाही. तरी माहितीस्तव सविनय सादर.

यावर मेकॅ.इंजि. यांचा अभिप्राय की, सद्यस्थितीत गाळा क्र.३९ मो.व्हे. विभागाच्या ताब्यात नाही. तसेच मो.व्हे. विभागास आवश्यकताही नाही सबब आपले माहितीस्तव सादर./ **अ**

यावर उपायुक्त (कर)यांचा अभिप्राय की,मार्केट विभाग प्रमुख "अ" पाहता विहित नियमानुसार पुढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव ठेवा.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर, प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्र.३९ करीता मा. मेकॅनिकल इंजिनिअर यांचा अभिप्राय मागविला असता सद्यस्थितीत गाळा क्र. ३९ मो.व्हे. विभागाच्या ताब्यात नाही. तसेच मो.व्हे. विभागास आवश्यकताही नाही असा अभिप्राय दिलेला आहे. सबब सदर गाळा भाडेतत्वावर देणेबाबत सध्याचे भाडे व अनामत रक्कम किती घ्यावी याबाबत मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे उचित वाटते. सबब आदेशार्थ सादर.

नगररचना विभाग
दिनांक ६/८/२०१३

**भाडे मुल्यांकन अहवाल**

सदर गाळयाची जागाही अहमदनगर नगररचना योजना क्र.अंतिम भुखंड क्र.१२९पै.मधील आहे.
१] सदर भागातील जमिनीचा शिघ्रसिध्दाणकाचा दर (विभाग क्र.१५/३)=८४९० चौ.मी.
२] आर.सी.सी. बांधकामाचा दर १०२००/- प्रति चौ.मी. (सन २०१३-१४ प्रमाणे)

सदरचे बांधकाम हे जवळपास ३० वर्षे जुने असल्याने ३०% घसारा वजावटीनंतर होणारी बांधकामाची किंमत = १०२००x७०% = २१४०/- प्रति चौ. फुट

घसारा वजावटीनंतर होणारी बांधकामाची किंमत = ७१४०/-

सदर जागेपोटी मनपास १०% प्रति वर्षे दराने उत्पन्न मिळणे आवश्यक आहे = (७१४०+८४९०) x.१० = १५६३.०० प्रति चौ. फुट प्रति वर्ष

तसेच देखभाल खर्च दुरूस्ती खर्च प्रशासकीय व वसुली खर्च विमा इ. बाबीसाठी आउट गोर्डंग २०%दराने गृहीत धरणे आवश्यक आहे. त्यामुळे वार्षिक उत्पन्नात २०% वाढ दर्शविणे आवश्यक आहे.

सबब अपेक्षित वार्षिक उत्पन्न १५६३ / ०.८०= १९५४.०० रू.

प्रति महिना १६०.०० प्रति चौ.मी.

त्यानुसार १६०.०० (६.०० x ४.५०)४३२०/- प्रति महिना भाडे तसेच रू.५००००/- अनामत रक्कम वसूल करणे योग्य होईल.

उपरोक्त नमुद भाडे हे मालमत्ता कारणाकरिता आहे त्यामुळे लाईट बील मालमत्ता कर स्वतंत्र भरणे अर्जदार यावर बंधनकारक राहील./**अ**

येणेप्रमाणे सहाय्यक नगररचनाकार यांचा अहवाल असे.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, **"अ"** मान्य.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मा.स्थायी समिती पुढे निर्णयासाठी ठेवणेस्तव व प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील गाळा क्रमांक- ३९ हा जागा भाडेतत्वावर दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रोफेसर कॉलनी शॉपींग सेंटर येथील (६.००X४.५०= २७ चौ.मी.) गाळा क्रमांक- ३९ हा अर्जदार सौ. मनिषा अक्षय भळगट, रा. प्रोफेसर कॉलनी, सावेडी,अ.नगर यांना दरमहा रू. ४३२०/- (रूपये चार हजार तीनशे वीस मात्र)जागा भाडे व रू.५०,०००/- (रूपये पन्नास हजार मात्र) अनामत रक्कम घेवून लाईट बिल, मालमत्ता कर स्वंतत्र भरणे अर्जदार यावर बंधनकारक राहिल. तसेच ज्यावेळेस महानगरपालिकेस भविष्यात प्रकल्पासाठी सदर गाळयाची आवश्यकता भासेल त्यावेळेस सदरचा गाळा महानगरपालिकेच्या ताब्यात द्यावा लागेल या अटीवर जागा भाडेतत्वावर देणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावा.

सूचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०५**

विषय क्रमांक- १२८ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

ठराव क्रमांक- १२८ शनिवार दिनांक ३१/८/२०१३

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रस्तावीत आकृतीबंधामध्ये ५०६ व ३०५ कोर्ट कर्मचा-यांचे कायम आस्थापना सुचीवरील समकक्ष स्थायी पदावर समावेशन करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग

संदर्भ :-१.मा. महासभा ठराव दि.१०/६/२०१३

२ .मा. कामगार युनियन व मनपा प्रशासना मध्ये झालेली दि. ३/५/२०१३ रोजी संयुक्त बैठक.

३.मा. कामगार युनियन याचे जा . क्र. ११/श्रमिक दि.८/६/२०१३ रोजीचे निवेदन.

४.मा. महापौर अहमदनगर महानगरपालिका यांचे पत्र. जा. क्र. २७८ दि. १०/६/२०१३

५.मा. विरोधी पक्ष नेते अहमदनगर महानगरपालिका यांचे दि. ४/६/२०१३ रोजीचे पत्र

६. मा. महानगरपालिका सदस्य सौ. शारदाताई दिगंबर ढवण, श्री. सतिष नानासाहेब भारस्कर, श्री, बाळासाहेब रेवजी पवार,सौ. खरमाळे संगिता रत्नाकर, श्रीमती.मुदगल मथुरा भिम, सौ.सुमनताई गंधे, श्री. निखिल वारे,सौ.रजनी अरविंद शिंदे यांचे ५०६ व ३०५ कोर्ट कर्मचा-यांचे समावेशन करणेबाबतचे पत्र.

७. जा.क्र. नगरसचिव amc-५२९८ दि.४/७/२०१३

सादर ,

वरील विषयानुसार सविनय सादर करणेत येते की, संदर्भ क्र.२ च्या संयुक्त बैठकीमध्ये औरंगाबाद महानगरपालिका व पुणे महानगरपालिका मध्ये रोजंदारी कर्मचा-यांना समकक्ष स्थायी पदावर सामावुन घेणेबाबत काय कार्यवाही केली याबाबत माहीती घेणेबाबत उभयपक्षी निर्णय घेण्यात आलेला होता. त्यानुसार औरंगाबाद व पुणे महानगरपालिकेकडुन माहिती माहिती प्राप्त करुन घेतली असता औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये ११२४ रोजंदारी कर्मचा-यांना कायमस्वरुपी सेवेत सामावुन घेण्यासाठी रितसर पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता त्यानुसार शासनाने शासननिर्णय क्र.एएमसी १४२०००/२२०३/प्र.क्र.१३८/२०००/नवि-२४ दि. १० नोव्हेंबर २००३ नुसार शासनाने ११२४ पदांना मुंबई प्रांतिक अधिनियमच्या कलम ५१(४) अन्वये मंजुरी व सदर पदांवर कर्मचा-यांना कायम स्वरुपी सामावुन घेण्याबाबत मंजुरी दिलेली आहे (सोबत शासन निर्णयाची प्रत )

पुणे महापालिकेमार्फ़त रोजंदारी कर्मचा-यांसाठी वेळोवेळी पदनिर्मीती प्रस्ताव शासनास पाठवुन त्यानुसार पदनिर्मिती करण्यात आलेल्या आहेत व रिक्त होणा-या पदांवर नेमणुका सलगपणे चालु ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर पदांवर नेमणूका करणेकामी महासभेची मान्यता घेण्यात येवून नेमणका केलेल्या दिसुन येत आहे.

कामगार युनियन यांनी दि.८/६/२०१३ रोजी प्रस्तावित आकृतीबंधामध्ये ५०६ व ३०५ कोर्ट कर्मचा-याचे कायम आस्थापनासुचीवरील समकक्ष पदावर समावेशन करणेबाबत निवेदन दिलेले असुन खालिलप्रमाणे मागण्या केलेल्या आहे.

१.महापालिकेत सध्या रिक्त असलेल्या कायम आस्थापनेवरील पदांवर ५०६ व ३०५कोर्ट कर्मचा-यापैकी एस.एस.सी उत्तीर्ण कर्मचा-यांचे सेवाजेष्ठतेनुसार समावेशन करुन त्यांना बढती देण्यात यावी.

२. ५०६ व ३०५ कोर्ट कर्मचा-यांपैकी एकुण ३८७ पदे ही सफ़ाई कामगाराची व मेहतर कामगारांची आहेत. सदर कर्मचा-यांची पदे ही अस्थायी स्वरुपाची असुन आपले दि. ५-३-२०१३ रोजीचे बैठकीतील निर्णयानुसार सदर कर्मचा-यांच्या वारसांना लाड बर्वे समितीच्या शिफ़ारशीनुसार वारसाहक्काने नेमणुका देणे कामी सदर पदांचे रुपांतर अस्थायी पदावरुन कायम आस्थापनावरील स्थायी पदावर करणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर कर्मचा-याचे प्रथम कायम आस्थापनेवरील पदावर समावेशन करणे व तद्नंतर त्यांचे वारसांना वारसाहक्काने नेमणुका देणे याप्रमाणे कार्यवाही महापालिकेने करावी व सदर कामी महापालिकेने प्रस्तावित केलेल्या आकृतीबंधाच्या प्रारुपात सफ़ाई कामगारांची वाढीव ३८७ पदे प्रस्तावित करण्यात येवून त्यास मंजुरी घेण्यात यावी. तसेच आरोग्यखात्यातील सफ़ाई कामगारांचे नेमणूकी कामी मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानूसार शासनाने पारित केलेल्या घनकचरा अधिनियमातील सफ़ाई कामाच्या प्रमाणकानुसार सद्यःस्थितीत महापालिकेत एकुण सुमारे १२०० सफ़ाई कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने वरील ३८७ पदांसोबतच उर्वरीत पदांची तरतुद आकृतीबंधात प्रस्तावित करणेत यावी. तसेच आरोग्य विभागातील सफ़ाई कामाशी संबंधित उपआरोग्याधिकारी, सॅनिटरी इन्सपेक्टर, सब सॅनिटरी इन्सपेक्टर, सुपरवायझर इत्यादी तत्सम वाढीव पदांचाही प्रस्ताव ठेवण्यात यावा.

३.वरील मुद्दा क्र.१ व २ नुसार त्यातील कर्मचा-यांचे समावेशन झालेनंतर ५०६ व ३०५कर्मचा-या तील उर्वरीत पदे ही महापालिकेच्या कामकाजाकरीता भविष्यात आवश्यक असल्याने सदर पदेही आकृती बंधात प्रस्तावित करणेत येवुन त्यास मंजुरी देण्यात यावी.

तसेच संदर्भ क्र.३ ते क्र.६ नुसार, मा. महापौर, मा. विरोधीपक्ष नेते, मा. पालिकासदस्य यांनी पत्र देवुन प्रस्तावित आकृतीबंधाच्या दृष्टीने केलेल्या लेखीसुचना देवुन मा. कामगार युनियनने केलेल्या निवेदनाप्रमाणे समावेशनाबाबत मागणी केलेली आहे

मा.कामगार युनियन व मा.पालिकासदस्य यांच्या निवेदन/ पत्रांवर अहवाल सादर करण्यात येतो की,मा.कामगार युनियन यांनी सध्या शासनाकडे पाठविणेकामी महासभेपुढे ठेवण्यात आलेल्या आकृतीबंधा मध्ये ५०६व ३०५कोर्ट कर्मचा-यांसाठी व ३८७ सफ़ाई कामगारांची पदे लाड कमिटीच्या शिफ़ारशीनुसार भरण्याकामी पदामध्ये वाढ करणेबाबत निवेदन केलेले आहे.मनपाने मा.महासभेपुढे ठेवलेले मनपाचे सेवा प्रवेश नियमावर हरकती व सुचना मागवुन त्याची रितसर सुनावणी घेवुन आवश्यकत्या केलेल्या बदलासह सेवा प्रवेश नियम शासनाकडे पाठविणेस महासभेची मान्यता घेणेबाबतचा प्रस्ताव आस्थापना विभाग दि.२८/५/१३नुसार मा.महासभेच्या दि.१०/६/२०१३रोजीच्या सर्वसाधारण सभेत ठेवण्यात आलेला होता.महासभेमध्ये सदर बाबत येणेप्रमाणे ठराव पारित झालेला आहे.

**"ऑफ़िस रिपोर्ट व सभागृहामध्ये अहमदनगर महानगरपालिका प्रारुप सेवा प्रवेश नियम/ आकृतीबधाच्या विषयाबाबत बहुतांश मा. सदस्यांनी सदरचा विषयावर अभ्यास होणेगरजेचे असल्याबाबत चर्चा केली व ब-याच मा. सदस्यांनी लेखी सुचना केल्या. त्यादृष्टीने आकृतीबंधाचा विषय तुर्त स्थगित करण्यास ही सभा मान्यता देत आहे. मा. सदस्यांनी आकृतीबंधाच्या दृष्टीने केलेल्या लेखीसुचना, याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करावा व आकृतीबंधाच्या प्रस्तावा समवेत ठेवण्यात यावा. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी".**

वरील ठरावानुसार सदरचा विषय मा.महासभेने तुर्त स्थगित ठेवुन सदर विषयावर चर्चा होणे गरजेचे असल्याने मा. सदस्यांनी आकृतीबंधाच्या दृष्टीने केलेल्या लेखीसुचना, याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करावा व आकृतीबंधाच्या प्रस्तावा समवेत ठेवण्यात यावा असा निर्णय घेतलेला दिसुन येत आहे. तसेच जा.क्र. नगरसचिव amc-५२९८ दि.४/७/२०१३. नुसार आकृतीबंधाच्या दृष्टीने मा. नगरसेवकांनी केलेल्या लेखीसुचना जोडुन सादर केलेल्या आहेत. सदर सुचनामध्ये समावेशना व्यतिरिक्त, सौ.सुमनताई गंधे, श्री. संजय चोपडा, श्री.शेख आरिफ़ रफ़ियोद्दीन, सौ. संगिता खरमाळे, श्री. संग्राम जगताप, सौ. रजनी अरविंद शिंदे,श्री विनीत नाथ पाउलबुधे, श्री. शेंडगे संजय छगन, श्री. निखिल वारे, इत्यादी मा. नगरसेवकानी तसेच मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी सेवा प्रवेश नियमामधील अर्हताबाबत व इतरबाबी बाबत सुचना केलेल्या आहेत. सदरबाबत मा. महासभेने चर्चा करुन निर्णय घेणे उचित होईल.

सेवा प्रवेश नियमाबाबत शासन परिपत्रक क्रमांक अमपा- २००२/८२१/प्रक्र.८६/नवि-२३ दि.२ जुलै २००८ नुसार महापालिकेस प्राप्त निर्देशानुसार प्रक्रिया राबविण्यात आलेली असुन यापुर्वीच सेवा प्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द करुन हरकती व सुचना घेण्यात येवुन सुनावणी घेण्यात आलेल्या असुन सुचना व हरकती विचारात घेवुन सेवाप्रवेश नियम आवश्यक त्या दुरुस्तीसह महासभेपुढे ठेवण्यात आलेला आहे. सेवाप्रवेश नियमाबाबत शासन निर्णय २ जुलै२००८ नुसार सेवा प्रवेश नियम तयार करुन शासनाकडे पाठविण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असुन सद्यस्थिती मध्ये प्रशासनाकडुन प्रस्तावित सेवा प्रवेश नियमात कुठल्याही स्वरुपाचे फ़ेरबदल करणे उचित होणार नाही.

तथापि सेवा प्रवेश नियमासोबत जोडलेल्या व प्रस्तावित केलेल्या आकृतीबंधामध्ये मा. महासेभेच्या ठरावानुसार मा.महापौर, विरोधीपक्ष नेता,मा.मनपा सदस्य,मा.कामगार युनियन यांच्या प्राप्त लेखीसुचने नुसार,प्रस्तावित आकृतीबंधात अस्थायी पदांचे स्थायी पदांवर समावेशन करण्यासाठीच्या प्रस्तावावर महासभेची मंजुरी घेवुन शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविणे उचित होईल.

मा.महासभेच्या ठरावानुसार मा. महापौर, विरोधीपक्ष नेता, मा.मनपा सदस्य,व मा. कामगार युनियन यांचे लेखीसुचनांनुसार आकृतीबंधामध्ये अस्थायी पदांचे स्थायी पदांवर समावेशन करणेकरीता महानगरपालिकेमध्ये बिगारी शिपाई, सफ़ाई कामगार,लिपिक, फ़िटर, ड्रायव्हर संवर्गातील स्थायी अस्थायी पदांचा सद्यस्थितीदर्शक तक्ता येणे प्रमाणे.

| पदनाम | दर्जा | मंजुर | भरलेले | रिक्त | व्यपगत | समावेशना साठी आवश्यक पदे | प्रस्तावीत केलेली नविन स्थायी पदे | आवश्यक जादा प्रस्तावित करावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बिगारी शिपाई | स्थायी | ५७१ | ४५२ | ११९ | - | ८९४ | ५२७ | ३६७ |
| | अस्थायी | ४२२ | ३२३ | - | ११५ | - | - | - |
| | एकुण | ९९३ | ७७५ | | ११५ | ८९४ | ५२७ | ३६७ |
| सफ़ाई कामगार | स्थायी | ६५४ | ६११ | ४३ | - | १०७७ | ६५४ | ४२३ |
| | अस्थायी | ४२३ | ३२८ | - | ९५ | - | - | - |
| | एकुण | १०७७ | ९३९ | ४३ | - | १०७७ | ६५४ | ४२३ |
| लिपिक | स्थायी | २५६ | २१२ | ४४ | | ३६६ | ३६६ | - |
| | अस्थायी | १४ | १२ | - | २ | - | - | - |
| | एकुण | २७० | २२४ | ४४ | २ | ३६६ | ३६६ | - |
| ड्रायव्हर | स्थायी | ३९ | ३१ | ८ | | ५७ | ५७ | - |
| | अस्थायी | ३ | १ | | २ | - | - | - |
| | एकूण | ४२ | ३२ | ८ | २ | ५७ | ५७ | - |
| फ़िटर | स्थायी | १० | ८ | २ | - | ११ | १० | १ |
| | अस्थायी | १ | १ | - | - | - | - | - |
| | एकूण | ११ | १० | १ | | ११ | १० | १ |
| वायरमन | स्थायी | १९ | १६ | ३ | - | ३१ | ३१ | - |
| | अस्थायी | १ | १ | - | - | - | - | - |
| | एकूण | २० | १७ | ३ | | ३१ | ३१ | - |
| | | | | | | | एकूण | ७९१ |

महापालिकेतील सद्यस्थितीमध्ये आकृतीबंधामध्ये मा. महापौर, विरोधीपक्ष नेता, मा. कामगार युनियन यांच्या सुचनेनुसार बदल करावयाचा झाल्यास प्रस्तावित आकृतीबंधात अस्थायी पदांचे स्थायी पदांवर समावेशन करण्यासाठी उपलब्ध असलेल्या बिगारी, शिपाई संवर्गात ३६७ आवश्यक जादा पदे आकृतीबंधात नव्याने प्रस्तावित करावी लागतील.

तसेच महापालिकेतील सद्यस्थितीमध्ये अस्थायी पदांचे स्थायी पदांवर समावेशन करण्यासाठी सफ़ाई कामगार संवर्गातील पदांना लाड कमिटीच्या शिफ़ारशी असल्याने प्रस्तावित आकृतीबंधात अस्थायी सफ़ाई कामगार पदांचे समावेशन करण्यास ४२३ जादा आवश्यक स्थायी पदे प्रस्तावित आकृतीबंधामध्ये नव्याने प्रस्तावित करावी लागतील तसेच फ़िटर पदाचे स्थायी पदावर समावेशन करण्यासाठी नव्याने १ आवश्यक जादा पद प्रस्तावित करावे लागेल अस्थायी पदांचे स्थायीपदावर समावेशन करण्यासाठी बिगारी, सफ़ाईकामगार व फ़िटर या संवर्गामध्ये एकुण ७९१ जादा पदे आकृतीबंधात नव्याने प्रस्तावित करावी लागतील.

लिपिक, ड्रायव्हर, वायरमन इ.संवर्गातील पदे आकृतीबंधामध्ये पुरेशाप्रमाणात प्रस्तावित केलेली असल्याने सदरची पदे नव्याने आकृतीबंधात प्रस्तावीत करणे आवश्यक वाटत नाही.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये रिक्त असलेल्या सरळसेवेच्या समकक्ष रिक्त असलेल्या कायम आस्थापनासुचीवरील स्थायी पदावर कोर्ट कर्मचारी यांचे समावेशन करणेबाबत विचार करावयाचा झाल्यास सद्या महापालिकेच्या प्रस्तावित आकृतीबंधामध्ये उक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आवश्यक जादा पदांचा प्रस्ताव आकृतीबंधात नव्याने प्रस्तावित करुन मा.महासभेची मंजुरी घेवुन शासनाकडे पाठविणेबाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे.**शासनाने प्रस्तावित आकृतीबंधास मंजुरी दिल्यानंतरच त्याप्रमाणे शासकीय निकषा प्रमाणे समावेशनाची प्रत्यक्ष कार्यवाही करणे उचित होईल.**

तरी मा.महासभेचा दि. १०/०६/२०१३ रोजीचा ठराव, कामगार युनियन, मा. महापौर, मा. विरोधीपक्ष नेते, व मा. पालिकासदस्य यांचे लेखी सुचना विचारात घेता प्रस्तावित आकृतीबंधात बिगारी,शिपाई संवर्गात नव्याने ३६७ व सफ़ाई कामगार संवर्गात ४२३ स्थायी पदे व फ़िटर संवर्गात १ असे एकुण ७९१ पदे आकृतीबंधात नव्याने प्रस्तावित करुन सदरचा समावेशन करणेबाबतचा प्रस्ताव आकृतीबंधासोबत महानगरपालिका सेवा प्रवेश नियम समवेत मा. महासभेपुढे ठेवून मा. महासभेची मान्यता घेवुन शासनाकडे पाठविणे कामी महासभेच्या विचारार्थ ठेवणेस निर्णयास्तव व आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावाचे सविस्तर अवलोकन केले असता, सदरचा विषय मा. महासभेपुढे विचारार्थ तथा निर्णयास्तव ठेवणे योग्य तथापि आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, अहवालामध्ये नमुद केलेली ५०६ व ३०५ कोर्ट कर्मचा-यांच्या सेवा एक वेळची विशेष बाब म्हणून मा.संचालक न.प. प्रशासन संचालनालयाने अस्थायी पदे निर्माण करून नियमीत करण्यात आली आहे. मनपा कर्मचारी युनियन , मा. महापौर यांचे मागणीप्रमाणे व विभागाकडील प्रस्तावानुसार मनपाची कर्मचा-यांची आवश्यकता लक्षात घेउन कार्यवाही करावयाची झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५१ व प्रकरण ३ मधील १ तसेच तत्सम तरतुदी अन्वये मा.स्थायी समिती मार्फत मा.महासभा व मा. शासनाची पुर्वमंजुरी घेणे आवश्यक वाटते. तथापि योग्य त्या आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, उपायुक्त (सा.) यांचे अभिप्रायानुसार मान्य.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- आकृतीबंधामध्ये ५०६ व ३०५ कोर्ट कर्मचा-यांचे कायम आस्थापना सुचीवरील समकक्ष स्थायी पदावर समावेशन करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचा ७६ कर्मचा-यांचे काय ?

मा.सौ. खरमाळे सं.र. :- कोर्टाचे ५०६ व ३०५ घेतले. कोर्ट वारस ७६ कर्मचा-यांचा ऑफिस रिपोर्ट मध्ये समावेश केला का.

आस्थापना विभाग श्री. खोलम :- कोर्ट वारस ७६ कर्मचा-यांचा समावेश ५०६ व ३०५ मध्ये केलेला आहे.सन्माननीय सदस्य व युनियनच्या मागणी नुसार बिगारी, शिपाई-५७१ पदे मंजूर आहेत.३६७ ॲडीशनल पदे प्रस्तावीत आहेत. ६५४ स्थायी पद सफाई कामगार मंजूर आहेत.४२३ ॲडीशनल पदे प्रस्तावीत आहेत.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- स्टॅंडिंग मध्ये मंजूर केल्यानंतर कुठे पाठवणार.

आस्थापना विभाग श्री. खोलम :- मा. महासभे मध्ये पाठवणार व त्यानंतर मा. शासनाकडे पाठवणार

मा.सौ. खरमाळे सं.र. व मा.श्री.कवडे उ.खं. :- मा. शासनाचे पत्र वाचून दाखवा. पद निमित्तीचे अधिकार आयुक्तांना आहेत का?

आस्थापना विभाग श्री. खोलम :- नाही.

मा.श्री. कवडे उ.खं. :- मा. शासनाने कळविले आहे की हे अधिकार आयुक्तांना आहेत. त्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. ते पत्र वाचा.

आस्थापना विभाग श्री. खोलम :- मा.महाराष्ट्र शासन,अमपा २०११ / प्रक्र३५४/ नवि ३ २५ नगरविकास विभाग, मंत्रालय,मुंबई दि.१६ फेब्रुवारी,२०१३ हे पत्र या मुद्याशी संबंधीत नाही.

मा.सौ. खरमाळे सं.र. ,मा.श्री.कवडे उ.खं. व मा.श्री. भोसले ग.पुं. :- ज्या दिवसापासून त्यांना कायम केले ती तारीख सेवाजेष्ठते करता धरली जावी कारण ते आपलेच कर्मचारी आहे दुजाभाव करू नये ते पालिकेचे काम करतात.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- आपण तसेच करतो.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- कोणती तारीख सेवाजेष्ठते करीता धरणार.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- पद मंजूरीची तारीख गृहीत धरणार आहोत.

मा.श्री.कवडे उ.खं.व मा.श्री. भोसले ग.पुं :- ते रूजू झाले तेव्हांपासून सेवाजेष्ठतेकरीता तारीख धरावी.

मा.सौ.गंधे सु.मो.:-कर्मचा-यांच्या विषयाच्या बाबत पुढील माहिती द्या.१] सदरचे कर्मचारी केंव्हा कायम झाले आहेत.?२] सदरचे कर्मचारी कोणाच्या आदेशाने कायम झालेले आहेत?३] सदर कर्मचा-यांची सेवापुस्तकातील नेमणूक दिनांक कोणती आहे?४]सदर कर्मचारी समायोजनानंतर त्यांची नेमणूक दिनांक कोणती धरण्यात येईल?५] सदर कर्मचा-यांना बढती देतांना नेमणूक दिनांक ग्राहा धरण्यात येवून बढती देणार का?६] सदर प्रस्तावामध्ये कोर्ट वारस-७६ कर्मचा-यांचा समावेश आहे का?नसल्यास समावेश करण्यात यावे.

आस्थापना विभाग श्री. खोलम :-१] मा.औद्योगीक न्यायालयाच्या निर्णयानुसार सन १९८५ ते १९९४ या कालावधीत वेगवेगळया तारखांना कायम झाले आहेत.,२] मा.संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे आदेशाने कायम झाले आहेत.,३] मा.औद्योगीक न्यायालयाच्या निर्णयानुसार सेवा पुस्तकात नेमणूक दिनांक दर्शविण्यात आलेला आहे.,४] मा.शासनाच्या मार्गदर्शनानुसार नेमणूक तारीख धरण्यात येईल.,५] मा.शासनाच्या मार्गदर्शनानुसार नेमणूक दिनांक ग्राहय धरून बढती बाबत कार्यवाही करण्यात येईल. , ६] होय.

मा.सौ. खरमाळे सं.र. :- पदोन्नतीकरीता सेवाजेष्ठता की शिक्षण महत्वाचे.

आस्थापना विभाग श्री. खोलम :- सेवाजेष्ठता.

मा.सौ.खरमाळे सं.र. :- शिक्षण महत्वाचे नाही का महत्वाचे, एखादा जर उच्या शिक्षीत असेल तर त्याला प्रमोशन का देत नाही.

आस्थापना विभाग श्री. खोलम :- जँपीग प्रमोशन देण्याची तरतूद नाही.

उपायुक्त (सा.) डॉ. डोईफोडे :- अॅवॉर्डनुसार जी. शैक्षणिक पात्रता आहे त्यानुसार पदोन्नती दिली जात असल्याने कमी शिक्षणाच्या पण सेवाजेष्ठ असलेल्या कर्मचा-यांना पदोन्नती मिळते.

मा.सौ. गंधे सु.मो. :- ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ मा. महासभेपुढे ठेवण्यांत यावा.

मा.श्री. कवडे उ.खं. :- ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ मा. महासभेपुढे ठेवण्यांत यावा.

मा.सभापती साहेब :- सभेत झालेल्या चर्चेनुसार ऑफिस रिपोर्ट मा.महासभेपुढे निर्णयार्थ ठेवण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रस्तावीत आकृतीबंधामध्ये ५०६ व ३०५ कोर्ट कर्मचा-यांचे कायम आस्थापना सुचीवरील समकक्ष स्थायी पदावर समावेशन करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ मा.महासभेपुढे ठेवण्यांत यावा.

सुचक :- मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कवडे उमेश खंडेराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका